| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | १३/०८/२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १३/०८/२०२४ |
| निकाल दिनांक | : | ०७/०८/२०२६ |
| कालावधी | : | ०१ वर्षे ११ महिने २५ दिवस |

**निशाणी क्र. ओ -**

## पीठासीन अधिकारी तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली यांचे न्यायालयात

**( श्री. एस. जी. कोरे यांचेसमोर )**

## अर्ज (आय.डी.ए.) क्र. ११/२०२४

CNR No. MHLC100003902024

**शंकर मार्तंडा माने (मयत)**

तर्फे वारसदार

१. **श्री. राहुल शंकर माने**
वय : ३१ वर्षे, धंदा : शेती

२. **श्री. नितीन शंकर माने**
वय : २९ वर्षे, धंदा : शेती
वरील दोघे रा. जांभुळणी, ता. आटपाडी, जि. सांगली

३. **सौ. शकुंतला विश्वास यादव**
वय : २६ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. घाटकोपर, मुंबई.

**.... अर्जदार**

विरूध्द

१. **ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत कार्यालय, जांभुळणी
ता. आटपाडी, जि. सांगली.

२. **सरपंच,**
ग्रामपंचायत कार्यालय, जांभुळणी
ता. आटपाडी, जि. सांगली.

**.... जाबदार**

**उपस्थिती :–**

अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. जाधव.
जाबदार – एकतर्फा.

## –: <u>न्या य नि र्ण य</u> :–

(दिनांकः– ०७/०८/२०२६)

१. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी जाबदार यांचेकडून त्यांच्या मयत वडीलांच्या किमान वेतनातील फरकाच्या रकमेपोटी रक्कम रुपये २,६७,२५६/– ही रक्कम त्यांचे पुर्वहक्कावर आधारीत असून ती त्यांना देवविण्याची मागणी करत प्रस्तुतचा अर्ज औद्योगिक विवाद अधिनियमाचे कलम ३३–सी(२) अन्वये दाखल केला आहे.

**<u>अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की</u> :**

२. अर्जदार यांचे वडील हे जाबदार यांचेकडे दि. ०१/०८/२०११ पासून शिपाई (अकुशल) या पदावर कामास लागले. ते आकृतीबंधातील कर्मचारी म्हणून काम करीत होते. त्यांना सुरूवातीस दरमहा रू. १६००/– इतका पगार होता. वेळोवेळी पगारात वाढ होवून किमान वेतनाप्रमाणे त्यांचा शेवटचा पगार रू. ८,८००/– इतका होता. अर्जदार यांचे वडील दि. ०१/०६/२०२३ रोजी कामावर असताना मयत झाले.

३. जाबदार ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था असून जाबदार ग्रामपंचायतीस किमान वेतन कायदा व कामगार कायदे लागू आहेत. अर्जदार यांचे वडील व जाबदार यांचेत कामगार–मालक नाते अस्तित्वात होते. अर्जदार यांच्या वडीलांची सेवा निष्कलंक आहे. जाबदार ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असल्याने जाबदार ग्रामपंचायत ही परिमंडळ–३ मध्ये मोडते. सबब, अर्जदार हे त्यांच्या मयत वडीलांच्या किमान वेतनातील फरकाच्या रकमेपोटीची रक्कम रुपये २,६७,२५६/– मिळणेस पात्र असल्याने अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाव्दारे किमान वेतनातील फरकाच्या रकमेपोटी रक्कम रुपये २,६७,२५६/– इतकी रक्कम देणेसंदर्भात जाबदार यांना आदेशित करणेसंदर्भात विनंती केली.

४. जाबदार यांना निशाणी क्र. ओ-१ अन्वये रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवण्यात आली. तथापी, नोटीस लागू होऊनदेखील जाबदार हे सदर कामी हजर झाले नाहीत त्यामुळे दिनांक १९/०६/२०२५ रोजी जाबदार यांचेविरूध्द प्रकरण एकतर्फा चालविणेचा आदेश पारीत करण्यात आला.

५. अर्जदार यांच्या अर्जातील कथनांचा विचार करता सदर प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार यांची मागणी ही पूर्वहक्कावर आधारित आहे का? असल्यास, अर्जदार किती रक्कम मिळणेस पात्र आहे? | होय. अंतिम आदेशाप्रमाणे. |
| २) | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजूर करणेत आला. |

## –: कारण मीमांसा :–

**मुद्दा क्र. १ करीता**

६. सदर प्रकरणात अर्जदार यांचेतर्फे त्यांची बाजू सिध्द करण्याकरिता अर्जदार क्र. १ यांना त्यांचा पुरावा निशाणी यु–६ वर नोंदविला आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींचा उहापोह केला आहे. अर्जदार यांचे वडील जाबदार ग्रामपंचायत सन २०११ पासून शिपाई म्हणून काम करीत होते. जाबदार व अर्जदार यांचे मयत वडील यांचेमध्ये मालक–कामगार नाते अस्तीत्वात होते. शासनाच्या किमान वेतन परिपत्रकाप्रमाणे त्यांचे मयत वडीलांना दरमहा किमान वेतन रू. ११,६२५/– व दरमहा विशेष भत्ता रू. २०१५/– मिळून एकत्रित रू. १३,६४०/– इतके वेतन होते. अर्जदार यांचे मयत वडीलांना जाबदार यांनी किमान वेतनाप्रमाणे पगार

न दिल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून किमान वेतनातील फरकाची मागणी केली आहे. सबब, अर्जदार यांनी किमान वेतनातील फरकाची रक्कम रू. २,६७,२५६/– व्याजासह मिळणेची विनंती केली.

७. जाबदार यांचेविरूध्द प्रकरण एकतर्फा सुरू असल्याने जाबदार यांचेविरूध्द 'उलटतपास नाही' असा आदेश दिनांक ०९/०३/२०२६ रोजी पारीत करणेत आला.

८. अर्जदार यांनी त्यांच्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त ग्रामपंचायतीचे सेवानियम, किमान वेतन परिपत्रक, विशेष भत्ता परिपत्रक, ग्रामपंचायत कर्मचा–यांच्या वेतन देयकाची नोंदवही इ. कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा आधार घेतला आहे. अर्जदार यांनी निशाणी यु–१० ला पुरसीस देवून पुरावा बंद केला.

९. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांचे वडील हे जाबदार यांचेकडे दि. ०१/०८/२०११ पासून शिपाई (अकुशल) पदावर कामास लागले. अर्जदार यांचे वडील हे आकृतीबंधातील कर्मचारी म्हणून काम करीत होते. त्यांना सुरूवातीस दरमहा रू. १६००/– इतका पगार होता. वेळोवेळी पगारात वाढ होवून किमान वेतनाप्रमाणे त्यांचा शेवटचा पगार रू. ८,८००/– इतका होता. अर्जदार यांचे वडील दि. ०१/०६/२०२३ रोजी कामावर असताना मयत झाले.

१०. जाबदार ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था असून जाबदार ग्रामपंचायतीस किमान वेतन कायदा व कामगार कायदे लागू आहेत. अर्जदार यांचे वडील व जाबदार यांचेत कामगार–मालक नाते अस्तित्वात होते. अर्जदार यांच्या वडीलांची सेवा निष्कलंक आहे. जाबदार ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असल्याने जाबदार ग्रामपंचायत ही परिमंडळ–३ मध्ये मोडते. सबब, अर्जदार हे त्यांच्या मयत वडीलांच्या किमान वेतनातील फरकापोटीची रक्कम रू. २,६७,२५६/– इतकी रक्कम व्याजासह मिळणेस पात्र असल्याने अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

११. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात त्यांच्या मयत वडीलांच्या किमान वेतनातील फरकापोटीची रक्कम मागणी केली आहे. अर्जाचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, अर्जदार यांनी परिमंडळ–३ मधील अकुशल कामगारास लागू असलेल्या वेतनदरानुसार वेतनाचा दावा केला आहे. अर्जदार यांचे मयत वडील हे जाबदार ग्रामपंचायतीमध्ये शिपाई (अकुशल) पदावर कार्यरत होते.

१२. अर्जदार यांनी त्यांचे मयत वडीलाच्या माहे ऑगस्ट, २०११ ते मे, २०२३ या कालावधीतील किमान वेतनातील फरकाच्या रकमेची मागणी केली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये किमान वेतनातील फरकाची रक्कम ही रू. २,६७,२५६/– अशी नमूद केली आहे. अर्जदार यांनी दावा केलेल्या व प्रत्यक्ष अदा झालेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम अर्जदार यांच्या मयत वडीलांना अदा करण्यात आलेबाबतचा जाबदार यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे, संबंधित मूलभूत वेतनाचे दर तसेच विशेष भत्त्याचे लागू असलेले दर विचारात घेतल्यास वेतनातील फरकाची रक्कम रु. २,६७,२५६/– इतकी येते. म्हणून अर्जदार यांनी दावा केल्याप्रमाणे सदर रक्कम मिळण्याचा अर्जदार यांना अधिकार आहे. अर्जदार यांनी केलेली मागणी ही औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम ३३–क(२) अंतर्गत पूर्वहक्क/लाभावर आधारित आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता**

१३. अर्जदार यांनी केलेली मागणी ही औद्योगिक विवाद अधिनियमाच्या तरतुदीन्वये पूर्व हक्कावर आधारित आहे असे अर्जदार यांनी सिध्द केले आहे या मतास मी आलो आहे. परिणामी अर्जदार हे मागणी केलेप्रमाणे अनुतोष मिळणेस पात्र आहेत या मतास मी आलो आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

# आ दे श

१. अर्ज अंशत: मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार हे त्यांच्या मयत वडीलांच्या किमान वेतनातील फरकापोटीची रक्कम रूपये २,६७,२५६/-(अक्षरी रूपये दोन लाख सदुसष्ठ हजार दोनशे छप्पन्न फक्त) मिळण्यास हक्कदार आहेत. त्याप्रमाणे जाबदार यांनी सदर रक्कम अर्जदार यांना तीन महिन्यात द्यावी अन्यथा प्रस्तुत आदेशाच्या तारखेपासून संपूर्ण रक्कम अदा होईपर्यंत द.सा.द.शे. ६ टक्के व्याज द्यावे.

LABOUR COURT MAHARASHTRA

Digitally signed by SACHIN GOURIHAR KORE
Date: 2026.08.07 13:21:24 +0530

( एस. जी. कोरे )
पीठासीन अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली

स्थळ : सांगली
दिनांक : ०७/०८/२०२६

| | |
|---|---|
| युक्तीवादाची तारीख | : ०३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय टंकलेखनाची तारीख | : ०७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय तपासल्याची व सही केल्याची तारीख | : ०७/०८/२०२६ |